लातूर जिल्ह्याच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाचे योगदान ", एक चिकित्सक अभ्यास(२०२०-२०१५) ".

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वाणिज्य शाखेअंतर्गत
पीएच. डी. संशोधन पुर्व आराखड

* संशोधक *

शितल नरसिंग पुरी

.कॉम.एम), बी.एड., सेट, जी.सी.डी.&ए (

*संशोधन मार्गदर्शक *

प्राडॉ मारोती धोंडीबा कच्छ .वे

वाणिज्य विभाग प्रमुख

कैरमेश वरपूडकर कला ., वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

सोनपेठ जि.परभणी .

२०१९

" लातूर जिल्ह्याच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाचे योगदान, एक चिकित्सक अभ्यास." (२०१५-२०२०)

***प्रस्तावना :-**

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषीला अत्यंत महत्व आहे. व त्यावर विविध व्यवसाय अवलंबून आहेत. भारतातील राहणाऱ्या लोकांचे जीवन हे ग्रामीण वंश परंपरांशी निगडित आहे. जागतिक मानव विकास अहवालाच्या निर्देशानुसार भारतीय लोक हे सर्वात जास्त ग्रामीण भागात वास्तव्य करू शकत असून त्यांना उपलब्ध असलेल्या मूलभूत सेवा-सुविधांची व्याप्ती मर्यादित आहे. त्या सुविधांची व्यवस्थित देखभाल अंमलबजावणीत उदासीनता दिसून येते.

भारतात सर्वात जास्त खेडी असल्यामुळे, खेड्यांचा देश म्हणूनही ओळख आहे. सध्यस्थितीला ६८ % जनता खेड्यात वास्तव्य करते. महात्मा गांधीजींच्या मते,`भारत की आत्मा गांवो मे बसती है'| या वाक्या नुसार सद्यस्थितीला सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, दृष्टिकोनातून सत्य आहे. जर आपल्याला देशाचा विकास करायचा असेल; तर सर्वात आधी ग्रामीण भागाचा विकास करणे गरजेचे आहे. आजही ग्रामीण भागात वंशपरंपरागत, कुटिर उद्योग केले जातात व त्यांच्यावर त्याची उपजीविका भागवली जाते. जर अशा लोकांना भांडवलाचा पुरवठा करून व त्यांच्यात कौशल्य विकसित केले तर ग्रामीण भागाच्या विकासाला हातभार लागेल. ग्रामीण भागाकडून कामासाठी शहरी भागाकडे होणारे स्थानांतरनाचे प्रमाण कमी होईल.

“ गाव हा विश्वाचा नकाशा |
गावावरून देशाची परीक्षा |
गावाची भंगता अवदशा!
येईल देशा |”

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या मते, राष्ट्रबांधणी व राष्ट्र विकास ग्रामीण विकासावर अवलंबून आहे. ग्रामीण भागात सर्वात जास्त निरक्षरता, बेकारी, अज्ञान, दारिद्र्य, भांडवल कमतरता ह्या समस्या आहेत. ह्या समस्या सोडवल्या शिवाय ग्रामीण भागाचा विकास होणार नाही. तो पर्यंत देशाचा विकास होणार नाही. त्यासाठी भांडवलाप्रमाणे कौशल्य विकसित होणे गरजेचे आहे.

भारतीय अर्थव्यवस्था ही कृषिप्रधान अर्थव्यवस्था आहे. तरीसुद्धा भारताने उद्योग व्यापार, सेवा क्षेत्र, आर्थिक क्षेत्र, सामाजिक क्षेत्र, राजकीय क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र इत्यादी मध्ये मोठ्या प्रमाणात प्रगती केली आहे. जगभरातील विचारवंतांचे, तज्ञांचे, अभ्यासकांचे असे मत आहे की, भारत देश हा काही वर्षात ठिक-ठिकाणी नव्या उद्योजकातील आव्हाने, उद्योजकातील मानवी जीवन, जागतिकीकरणाच्या आव्हाने, माणूस आणि नवे उद्योजक विषयावर विचार करत आहे. भारत हा महासत्ता बनण्यासाठी अनेक प्रकारचे पावले उचलत आहे. त्यातीलच कौशल्य विकास हे उद्योग क्षेत्रातील महत्त्वाचे पाऊल आहे. म्हणजेच उद्योग क्षेत्रातील सर्वात मोठी क्रांती आहे. यामधून नव युवकांना प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होताना दिसून येत आहेत." बाळाचे पाय पाळण्यात दिसतात" या म्हणीप्रमाणे भारताचे महासत्ता बनण्याचे स्वप्न पूर्ण झाल्याचे दिसत आहे.व्यवसाय शिक्षणाचे आव्हान आपण स्वीकारले आहे. व ते पूर्ण करण्यासाठी, मनुष्यबळाला कौशल्य प्राप्त करून देण्याची काळाची गरज निर्माण झाली आहे. ही गरज पूर्ण करण्याचे कार्य कौशल्य विकास व इतर योजनांच्या माध्यमातून केले जाताना दिसून येत आहे.

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१..२ कोटी आहे. यामध्ये पुरुष ५१..५%, स्त्रिया ४५.५ %, व शहरी लोकसंख्या ३१.२ % व ग्रामीण लोकसंख्या६८.४७% आहे. तसेच महाराष्ट्राची लोकसंख्या११.२४ कोटी आहे.५८४ लाख, स्त्रिया५४० लाख तसेच ग्रामीण लोकसंख्या ६१५ लाख, व शहरी ५०९ लाख आहे. त्याचप्रमाणे लातूर जिल्ह्याची लोकसंख्या २४५६ हजार इतकी आहे. सन२०११ च्या जनगणनेनुसार साक्षरतेचे प्रमाण भारतात ७४.0%, महाराष्ट्रात ८२.९% व लातूरमध्ये ७७.२६% इतके आहे.

समाजातील प्रत्येक साक्षर व्यक्ती कौशल्यपूर्ण असेलच असे नाही. व प्रत्येक निरक्षर व्यक्ती कौशल्यपूर्ण नाही असे म्हणता येणार नाही. प्रत्येक व्यक्तीकडे काही वंशपरंपरागत कौशल्य विकसित असतात. त्यावर अशा व्यक्ती आपले परंपरागत व्यवसाय करत असतात. परंतु त्याच्याकडे कौशल्य असल्याचे प्रमाणपत्र नसल्यामुळे रोजगाराच्या संधी उपलब्ध होत नाहीत. त्यांना त्यांचा व्यवसाय वाढवण्यासाठी पुरेसे भांडवल नसल्यामुळे अशा व्यक्ती कौशल्यपूर्ण असूनही त्यांची आर्थिक - सामाजिक प्रगती होऊ शकत नाही. म्हणून अशा गरजू व्यक्तींना कौशल्य विकास कार्यक्रमातून परिपूर्ण असे कौशल्य विकसित करून त्यांना त्याचे प्रमाणपत्र व भांडवल उपलब्ध करून दिले जाते. कौशल विकास कार्यक्रमाप्रमाणे बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी सरकार नेहमीच रोजगाराच्या संधी व विविध योजना उपलब्धकरून देत असते. जेणेकरून समाजातील सर्व घटकांचा विकास व्हावा. भारताच्या लोकसंख्या वरून हे दिसून येते की, ६५% लोक हे कौशल्य विकासाचे काम करू शकतील. सन २०१५ च्या संयुक्त राष्ट्रांच्या अहवालात असे म्हटले आहे की, २०२० पर्यंत भारतीय लोकांची वय २९ वर्ष म्हणजेच; भारत देश हा तरुणांचा देश असेल. अहवालानुसार चीन व अमेरिकेचे सरासरी वय ३७ वर्षे असेल. या संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार असे समजते की, भारत सर्वात मोठा युवाशक्तीचा देश आहे. जर कोणत्याही देशाला आपली आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, वैद्यकीय, सेवा क्षेत्र, उद्योग क्षेत्र इत्यादी व अशा देशातील सर्व क्षेत्रांमध्ये प्रगती करायची असेल तर या युवा तरुणांच्या अंगी शैक्षणिक अहर्ता प्रमाणेच त्यांच्या आवडीच्या क्षेत्रातील कौशल्य विकसित असणे गरजेचे आहे. कारण प्रत्यक्ष काम करण्यासाठी पदवी प्रमाणेच कौशल्याची अत्यंत गरज असते. संयुक्त राष्ट्राच्या अहवालाच्या आकडेवारीनुसार असे लक्षात येते की, सन २०२२ पर्यंत भारतात काम करणाऱ्या हातांची संख्या जगातील सर्व देशांपैकी जास्त असेल. त्या दृष्टीने प्रशिक्षण देण्यासाठी युवकांना तयार करणे हे भारतासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. सध्या भारतात उद्योग व्यवसायामध्ये कामगारांची वर्गवारी कुशल, अर्धकुशल व अकुशल अशाप्रकारे करून त्यांना त्यांच्या कामाचा मोबदला दिला जातो. भारतातील लोकसंख्येचा विचार करता सध्या २% लोकांकडे कुशल प्रशिक्षणाचे प्रमाणपत्र आहे. यावरून असे लक्षात येते की, भारतासमोर ` स्किल इंडिया ‘ बाबत आव्हान आणि संधी मोठ्या प्रमाणात आहेत. वाढती लोकसंख्या व सुशिक्षितांच्या संख्येवरून रोजगाराच्या संधीची वाढ महत्त्वाची आहे. जर रोजगाराच्या संधी वाढल्या नाहीत, तर बेरोजगारीचा प्रश्न खूप मोठ्या

प्रमाणात व्यवस्थेसमोर उभा राहील. या दृष्टीने विचार केला तर भारत हा तरुणांचा देश असल्यामुळे या तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणे गरजेचे आहे. या तरुणांना रोजगार निर्माण करून देण्यासाठी भारत सरकार नेहमीच तत्पर आहे. भारत देशामध्ये विकासासाठी व रोजगार निर्मितीसाठी वेगवेगळ्या प्रकारच्या योजनांची आखणी करून, त्या नेहमी राबविल्या जातात. त्याचा मुख्य उद्देश म्हणजे औद्योगिकीकरणाला चालना देऊन बेरोजगारीचे प्रमाण कमी करणे होय.

मानवी शरीरात ज्याप्रमाणे रक्तवाहिनी आपले कार्य करतात त्याप्रमाणे उद्योग व व्यापार क्षेत्रात कुशल कामगार कार्य करतात.भारतीय लोकांचा मुख्य व्यवसाय शेती असून एकूण लोकसंख्येच्या ७०% टक्के लोक हे शेती करतात. फक्त ३०% इतर क्षेत्रात कार्य करतात. जर देशाचे उत्पन्न वाढवायचे असेल तर उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्राप्रमाणेच शेती क्षेत्रातही कुशल कामगारांची गरज आहे. शेती क्षेत्रात कुशल कामगारांच्या मदतीने शेती बरोबरच शेती क्षेत्रातील उत्पादनावर प्रक्रिया व जोड उद्योग करता येतील. शेती क्षेत्र हे निसर्गावर अवलंबून असल्यामुळे कमी जास्त पाऊस, गारपीट, वादळ इत्यादी नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे नुकसान भरून काढता येत नाही; परंतु कमी करण्यासाठी कुशल कामगारांची आवश्यकता आहे. ही गरज पूर्ण करण्यासाठी भारत सरकार अनेक प्रकारच्या योजना राबवते. या योजनांमुळे कुशल कामगारांबरोबरच आर्थिक मदतही केली जाते.

भारतीय अर्थव्यवस्था हे मिश्र अर्थव्यवस्था आहे परंतु १९९१ नंतरच्या उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरणाच्या धोरणामुळे ` भारतीय अर्थव्यवस्थेची मुक्त अर्थव्यवस्थेत कडे वाटचाल सुरू झाली आहे’. भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास करण्यास सोयीचे होण्यासाठी प्राथमिक, द्वितीय क व तृतीय क्षेत्र तीन विभागात विभागणी केली आहे. प्राथमिक क्षेत्रात कृषी व संलग्न क्षेत्राचा समावेश होतो. उदाहरणात कृषी , पशूपालन , खाणकाम , मासेमारी इत्यादी. द्वितीय क्षेत्रात सर्व प्रकारचे लघु, मध्यम तसेच ब्रहत उत्पादन क्षेत्र उद्योग इत्यादी क्षेत्रांचा समावेश होतो.

तृतीय क्षेत्रात सेवा क्षेत्राचा समावेश होतो. उदाहरणार्थ वाहतूक , दळणवळण , बँका , विमा , व्यापार , औषधी सेवा , शिक्षण , वित्तीय सेवा , कायदा सेवा , माहिती तंत्रज्ञान , बातम्या , मिडीया , टुरिझम , रियल इस्टेट , लोकप्रशासन इत्यादी . या सर्व क्षेत्राची प्रगती व दर्जा सुधारण्यासाठी कुशल कामगार निर्माण करण्याची गरज आहे. व ती गरज पूर्ण करण्यासाठी सरकार विविध योजनांच्या माध्यमातून पैसे खर्च करत आहे त्यासाठी या अभ्यासविषयावर संशोधन करणे गरजेचे आहे.

लातूर हे शहर फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. लातूर शहर हे राष्ट्रकूट घराण्याची राजधानी होती. त्यानंतर बऱ्याच राजानी (राजकारण्यांनी) या जिल्ह्यावर राज्य केले. एकोणिसाव्या शतकात हैदराबाद संस्थानात हा जिल्हा होता व पुढे नंतर १९४८ मध्ये हा भाग स्वतंत्र होऊन ; १९६० मध्ये महाराष्ट्रात आला. पुढे काही कालावधीनंतर म्हणजेच , १६ ऑगस्ट १९८२ या दिवशी उस्मानाबाद जिल्ह्याचे विभाजन होऊन लातूर जिल्हा अस्तित्वात आला.

लातूर जिल्ह्याला राजकीय परंपरा लागू आहे. नवनिर्वाचित लातूरचे पहिले आमदार कै. केशवराव सोनवणे यांच्या रूपात जिल्ह्याला सहकार मंत्री पद मिळाले .१९५७ ते ६७ ह्या दहा वर्षाच्या कालावधीत ते लातूरचे आमदार होते. ते त्यानंतर पुना 1971 ते 80 या दहा वर्षाच्या कालावधीत औसा या तालुक्याचे आमदार होते. माजी मुख्यमंत्री कै. विलासराव देशमुख हे लातूरचे च होते. व ते राज्यसभा सदस्य होते. भारताचे माजी गृहमंत्री शिवराज पाटील हे लातूरचे आहेत.

लातूर हे महाराष्ट्राच्या आंध्र प्रदेश व कर्नाटकच्या सीमेवर असल्यामुळे तेथील लोकांच्या रूढी-परंपरा वेगवेगळया लातूर असून, तेथील लोक हे मराठी भाषेत सोबतच कन्नड आणि तेलुगू भाषा पण सहज बोलतात. जिल्हा औरंगाबाद विभागातील महत्त्वाचा जिल्हा असून तो महाराष्ट्राच्या आग्नेय सीमेवर आणि कर्नाटकच्या ईशान्येच्या सीमेवर स्थित आहे. लातूर जिल्ह्याच्या सीमेला जोडून नांदेड, बीड, उस्मानाबाद हे महाराष्ट्रातील जिल्हे आहेत. बिदर ह्या कर्नाटकातील जिल्ह्यांच्या सीमा आहेत .

लातूर जिल्ह्यात अनेक प्रसिद्ध असे प्रेक्षणीय स्थळे आहेत. लातूर जिल्ह्यात अष्टविनायक मंदिर (लातूर) ,विराट हनुमान (लातूर) , हकानी बाबा (लातूर) , गंजगोलाई ((लातूर), उदगीर चा किल्ला (उदगीर) , औसा किल्ला (औसा) , खरोसा लेणी (निलंगा), शिव मंदिर(निलंगा), नागनाथ मंदिर(वडवल), वनस्पती बेट(वडवल), साईधाम(तोंडार), साई नंदनवन (चाकूर), हत्तीबेट इत्यादी ऐतिहासिक स्थळे अस्तित्वात आहेत. त्याचप्रमाणे लातूर येथील औद्योगिक क्षेत्र प्रसिद्ध आहे.

लातूर जिल्हा औरंगाबाद प्रशासकीय विभागात येत असून; त्याचे एकूण क्षेत्रफळ ७०११६ चौ. कि.मी. आहे. हा जिल्हा १८.५० ते १८.७० अंश उत्तर अक्षांशावर; तर ७३.२५ ते ७७.२५ अंश पूर्व रेखांशावर स्थित आहे. लातूर जिल्हा समुद्रसपाटीपासून सुमारे ४४० ते ६३६ मिटर उंचीवर स्थित आहे. लातूर जिल्ह्याची जनगणना २०११ नुसार ०३ उपविभाग, (लातूर , उदगीर , निलंगा) , १० तालुके (लातूर , उदगी र, अहमदपूर , निलंगा , औसा , रेणापूर , चाकूर, देवणी , जळकोट , शि. आनंतपाळ) , 0७ शहरे, ९२८ गावे, तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांचा समावेश आहे. यात ०१ नगरपालिका (लातूर) , 0४ नगर परिषद , १० पंचायत समित्या , ०५ नगरपंचायती इत्यादींचा समावेश होतो.

लातूर जिल्ह्याचा प्रमुख व्यवसाय शेती असून त्याचबरोबर तेथील लोक वंशपरंपरागत व्यवसाय करतात. तेथील लोक हे संघटित व असंघटित दोन्ही क्षेत्रात काम करतात. लातूर जिल्ह्यात १८२ नोंदणीकृत कारखाने ,१७६ नोंदणीकृत चालू कारखाने ,१३ सहकारी साखर कारखाने, ०१ सहकारी सूतगिरणी आहे. या जिल्ह्यात लातूर, निलंगा, औसा, अहमदपूर, उदगीर या परिसरात औद्योगिक वसाहती पसरलेल्या आहेत. या औद्योगिक क्षेत्रात हात माग, वनस्पती तूप, भांडी, कागद, कापूस, साखर, तेलघाणे अशा प्रकारचे उत्पादन केले जाते.लातूर जिल्ह्यात औद्योगिक तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण दिले जाते. यात ६६ तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण शाळा , १० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था , ०१ व शासकीय

औद्योगिक प्रशिक्षण संस्था , ०५ अभियांत्रिकी महाविद्यालय ,०२ शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय , ०५ अभियांत्रिकी महाविद्यालय आहेत. या शैक्षणिक संस्था मार्फत विद्यार्थ्यांच्या ज्ञानाबरोबरच त्यांच्या अंगी असणारे विविध कौशल्य विकसित केले जाते.

कौशल्य विकास कार्यक्रमातून सरकार असंघटित क्षेत्रातील लोकांना प्रशिक्षण देईल. सरकार देशातील युवकांमध्ये कौशल्य विकास कार्यक्रमाची जागृती करून , प्रशिक्षण रोजगाराच्या संधी , प्रमाणपत्र , पैसे देणार आहे. यावर सरकारचा खूप मोठ्या प्रमाणात पैसा खर्च होत आहे. केंद्र शासन प्रत्येक राज्यात स्वतंत्र अशी स्किल युनिव्हर्सिटीची स्थापना करणार आहेत. कौशल्य विकास कार्यक्रमात भारतापेक्षा इतर देश अग्रेसर आहेत. त्यांच्या बरोबरीत येण्यासाठी देशात विविध पातळीवर कौशल्य विकास कार्यक्रमासाठी प्रयत्न केले जात आहेत. आपल्या देशात एका सर्वेक्षणात असे सिद्ध झाले आहे की , ३.५% युवा कौशल्य विकासात अग्रेसर आहेत व ९५.५% लोकांना प्रशिक्षण देण्याची गरज आहे. इतर देशांमध्ये हेच प्रमाण जास्त आहे. उदाहरणार्थ- जापान ८०% , कोरिया ९६% , जर्मनी ७४% , अमेरिका ५६% , चीन ४५% इत्यादी. या सर्व देशातील कौशल्य विकास कार्यक्रमाच्या प्रगतीचा आलेख उंचावत आहे. परंतु त्या मानाने भारतातील कौशल्य विकास कार्यक्रमाचा आलेख खाली घसरता आहे. म्हणून या जागतिकीकरणाच्या स्पर्धेत टिकण्यासाठी भारतात स्किल इंडिया मोहिमेला सर्वोच्च स्थान प्राप्त झाले आहे. स्किल इंडिया यशस्वी करण्यासाठी केंद्र सरकार, राज्य सरकार व इतर मंत्रालय तसेच खासगी व सरकारी कार्यालय, त्याचप्रमाणे इतर कर्मचारी युवकांचा हातभार महत्त्वाचा ठरणार आहे.

प्रत्येक सुशिक्षित किंवा पदवी प्राप्त करणाऱ्या व्यक्तीकडे योग्य ते कौशल्य असेलच असे नाही. म्हणून ते कौशल्य प्राप्त करण्याची काळाची गरज आहे. अशा प्रकारचे कौशल्य प्राप्त करून कुशल कामगार व उद्योजक रोजगार निर्माण करण्याच्या संधी प्राप्त करण्यासाठी सतत भारत सरकार, महाराष्ट्र शासन यांच्या पुढाकाराने लातूर जिल्हा प्रशासन लातूर जिल्ह्यामध्ये कौशल्य विकास व रोजगार निर्मितीसाठी वेगवेगळ्या योजना सतत राबवत असतात.

उदाहरणार्थ-(१) पंतप्रधानमंत्री कौशल्य विकास योजना , (२) प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियान , (३) दिन दयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना , (४) राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम , (५) डिजिटल साक्षरता अभियान , (६) प्रधानमंत्री श्रम योगी मानधन योजना,(७) जवाहर ग्राम समृद्धी योजना,(८) पंतप्रधान रोजगार योजना , (९) सुवर्ण जयंती ग्राम-स्वरोजगार योजना , (१०) महाराष्ट्रातील ग्रामीण उद्योग योजना , (११) बीज भांडवल योजना, (१२) मुद्रा योजना इत्यादी.

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना ही केंद्र सरकारची फ्लैगशीप योजनांमधील एक योजना आहे. कौशल्य विकास मंत्रालयाद्वारे चालवली जाते. ही योजना १५ जुलै २०१५ रोजी सुरू केली आहे. या योजनेचा मुख्य उद्देश युवकांना प्रशिक्षण, प्रमाणपत्र व रोजगार निर्माण करून देणे, तसेच उद्योग व्यवसाय चालू करण्यासाठी भांडवल पुरवठा करणे हा आहे. कार्यक्रमांतर्गत प्रशिक्षण घेणाऱ्या व्यक्तींची शुल्क सरकार भरते. आणि दहावी-बारावीनंतर शाळा सोडल्या अशा युवकांना प्रशिक्षण दिले जाते. भारत सरकारला २०२० पर्यंत एक करोड युवकांना प्रशिक्षण द्यायचे आहे. कौशल्य विकास योजनेअंतर्गत जवळपास ४० क्षेत्रात प्रशिक्षण दिले जाते. उदाहरणार्थ कन्स्ट्रक्शन, इलेक्ट्रॉनिक्स व हार्डवेअर, फुड प्रोसेसिंग, बँकिंग, मार्केटिंग ,वेगवेगळ्या प्रकारचे संगणकीय कोर्स, तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या ट्रेनिंग दिल्या जातात.

लातूर जिल्हा हा कृषिप्रधान जिल्हा असला तरी तो भूकंपग्रस्तांच्या जिल्हा म्हणून ओळखला जातो. या जिल्ह्यात दारिद्र्यरेषेखाली राहणाऱ्या लोकांची संख्या जास्त असल्यामुळे ह्या लोकांचे उत्पन्न कमी आहे. उत्पन्न कमी असल्यामुळे त्यांची खर्च प्रवृत्ती कमी आहे. या जिल्ह्यात रेषेखालील बेरोजगारांच्या सर्वांगिन विकासासाठी विविध योजना राबविल्या जातात.या जिल्ह्याच्या विकासात नव्याने प्रयत्न केले जातात. त्यातीलच एक प्रयत्न म्हणजे कौशल्य विकास योजना होय. या योजनेमार्फत मानव संसाधन औद्योगिक विकासात नव्या युगाची सुरुवात आहे या विविध योजनेवर खूप मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येत आहे. म्हणून खर्च प्रवृत्तीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

कृषी, औद्योगिक व ग्रामीण विकासासाठी तसेच ग्रामीण जीवनाशी निगडीत असलेल्या विविध योजने मार्फत मदत करण्यासाठी भारत सरकारने कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्रशंसनीय कामगिरी केली आहे. लातूर जिल्ह्यात कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राबविलेल्या विविध योजना व त्यातील तरतुदी तसेच खर्च यासंदर्भात सस्तर अध्ययन या प्रस्तुत संशोधन कार्यात केले जाणार आहे.

*प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनाः-

कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालयामार्फत प्रधानमंत्री कौशल विकास योजना राबविली जाते. ही भारत सरकारची एक अग्रणी कौशल्य प्रशिक्षण योजना आहे. याचा मुख्य उद्देश हा भारतीय युवकांमध्ये कौशल्य प्रशिक्षण व त्यांना एकत्रित आणणे हे आहे. कारण त्यातून ते रोजगार प्राप्ती व उपजिविकेचे साधन निर्माण करू शकतील.

केंद्रीय मंत्रीमंडळाने दिनांक २० मार्च २०१५ ला भारतातील सर्वात मोठ्या कौशल्य विकास योजना प्रधानमंत्री कौशल विकास योजनेला स्वीकृती दिली .

या योजनेच्या पहिल्या वर्षी ही योजना सफल करण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने खर्चासाठी १२००० करोड रुपये व १० करोड युवकांना प्रशिक्षण प्रदान करण्यासाठी आणखी चार वर्षांसाठी (२०१६-२०२०) परवानगी देण्यात आली. या योजनेला कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय कौशल्य विकास निगम एक सार्वजनिक मी जी भागीदारीचा अंतर्गत चालू केले आहे.

* योजनेचे घटक-

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत प्रशिक्षण व परीक्षा शुल्क सरकार भरते. प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र बरोबर पैसे दिले जातात .या योजनेचा खर्च केंद्र व राज्य सरकार७५:२५ या प्रमाणात करतात.

* या योजनेअंतर्गत पुढील तीन घटकांचा समावेश होतो.

१) अल्पावधी प्रशिक्षण-

या युवकांनी शाळा कॉलेजचे शिक्षण अर्ध्यात म्हणजेच दहावी/ बारावी मध्ये सोडले आहे; त्यांना छोटे मोठे कौशल्य डिजिटल साक्षरता, वित्तीय प्रशिक्षण दिले जाते.

२) अनुभवाला महत्त्व-

पूर्वीच्या शिक्षणासंबंधी अनुभव कौशल्य प्राप्त व्यक्तीचे मूल्यांकन करून त्यांना प्रमाणित केले जाते.

३) विशेष योजना-

यामध्ये विषयी क्षेत्र अथवा सरकारी औद्योगिक मंडळ प्रशिक्षण देतात.

* योजनेचे मुख्य उद्देश-

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजनेअंतर्गत भारताला जगातील कौशल्य राजधानी बनवण्याचा मुख्य उद्देश आहे. या योजनेचे विशेषता म्हणजे, ही योजना कौशल्य समावेश वृद्धीला प्रोत्साहन देते, मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, प्रधानमंत्री मुद्रा ऋण योजना आणि प्रधानमंत्री विमा योजना यासोबत मिळून काम करते.

* रोजगार उपलब्ध करून देणे- रोजगार उपलब्धी चे सन 2016 ते 2020 पर्यंत नोकरी, रोजगार व स्व-रोजगार यामध्ये वर्गीकरण केले आहे. आतापर्यंत भारतात७६% प्रशिक्षणार्थींना नोकरी/ रोजगार मिळाला आहे व २४% प्रशिक्षणार्थींनी स्वतःचाव्यवसाय सुरू केला आहे.

* मॉनिटरींग-

हे एक असून याचा उद्देश या योजनेअंतर्गत प्रशिक्षण केंद्र व प्रशिक्षणार्थींच्या व्हिडिओ कार्यावर लक्ष ठेवणे.

* आधार आधारित बायोमेट्रिक उपस्थिति प्रणाली एईबीएएस-

कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रावर उपस्थित विद्यार्थ्यांची उपस्थिती बायोमेट्रिक प्रणालीवर आधारित आहे. त्यामुळे प्रत्यक्ष प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षण दिले जाते का, ते किती विद्यार्थ्यांना, किती वेळ चालते हे माहित होण्यास मदत होते. त्यामुळे यात पारदर्शकता निर्माण झाली आहे.

* कौशल्य व रोजगाराचे शिबिर :-

कौशल्य व रोजगार शिबिरांमध्ये कौशल्य जागृती तसेच कौशल्यप्राप्त व्यक्तींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातात.

* भारत आंतरराष्ट्रीय कौशल्य केंद्र :-

भारत सरकार युवा भारतीय कार्यबल आला कौशल्य युक्त प्रशिक्षण देऊन श्रमशक्तीची कमतरता पूर्ण करण्यासकरण्यास तत्पर आहे. राष्ट्रीय कौशल्याच्या माध्यमातून भारतात आंतरराष्ट्रीय कौशल्य केंद्राची स्थापना करण्यात आली आहे.

* भारतातील आंतरराष्ट्रीय कौशल्य केंद्राचे वैशिष्टये :- या केंद्राच्या माध्यमातून जगातील इतर देशात काम करण्यासाठी युवकांना प्रशिक्षण दिले जाते. हे व्यवस्थापन संपूर्ण भारतात केले गेले आहे. आंतरराष्ट्रीय मानदंड याप्रमाणे प्रशिक्षण दिले जाते. या अंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या प्रशिक्षणार्थींचे मूल्यांकन एसएससी किंवा इंटरनॅशनल अवार्डिंग बोडीज या माध्यमातून केले जाते.

* राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम :-

भारत हा युवकांचा देश आहे. या देशात सर्व देशांपेक्षा युवकांची संख्या जास्त असल्यामुळे सुशिक्षित बेरोजगारांची संख्या वाढत आहे. दुसरीकडे कुशल कामगारांचा तुटवडा निर्माण होत आहे. या दोन्हीमध्ये दुवा साधण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य विकास उपक्रमाची सुरुवात १५ जुलै २०१५ ला केली. याचा मुख्य उद्देश या कार्यक्रमांतर्गत २०२२ पर्यंत ४०.२ कोटीयुवकांना प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट भारतासमोर आहे. त्यापैकी १०.४ कोटी युवकांना विविध कौशल्य प्रशिक्षण दिले जाणार आहे. नॅशनल सॅपल सर्व्हे नुसार, २०१९ पर्यंत देशात १२ कोटी कुशल कामगारांची आवश्यकता भासणार आहे. ही आवश्यकता पूर्ण करण्यासाठी राष्ट्रीय कौशल्य अभियान महत्त्वाचे ठरणार आहे. भारत देशात एकूण ३०२६ बालविकास केंद्रे आहेत. म्हणजेच देशातील प्रत्येक जिल्ह्यात कमीत कमी पाच कौशल्य विकास केंद्रे आहेत. त्यातून आतापर्यंत ५२ लाख युवकांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

* महाराष्ट्र - कौशल्य विकास व उद्योजकता विभाग : - प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान

महाराष्ट्रात प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान दिनांक ०२ सप्टेंबर २०१५ च्या शासन निर्णयावरून राबवले जात आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश राज्यातील युवक- युवतींना विविध क्षेत्रांमधील कौशल्य प्रशिक्षण देणे हे आहे. यामध्ये राष्ट्रीय पातळीवर ११ प्राधान्य क्षेत्र निवडण्यात आली आहेत. ही योजना राज्यातील सर्व प्रवर्गना लागू आहे. या अभियानाअंतर्गत १५ ते ४५ वयोगटातील व्यक्ती कौशल्य धारण करू शकतात. या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या व्यक्तीने स्वतंत्र व्यवसाय सुरू करावा असा याचा उद्देश आहे. या योजनेअंतर्गत प्रशिक्षित व्यक्तींना कौशल्य प्रमाणपत्र व रोजगार उपलब्ध करून दिला जातो; तसेच स्वतःचा व्यवसाय सुरु करण्यासाठी भांडवल उपलब्ध करून दिले जाते.

* संशोधन लेखांचा आढावा : -

* एस. के. माळी : -

एस . के. माळी यांनी त्यांच्या अभ्यास लेखात प्रमोद महाजन कौशल्य विकास व उद्योजकता अभियानाचा अभ्यास केला आहे. अभ्यासात या योजनेतून कुशल पूर्ण मनुष्यबळ व रोजगार संधी उपलब्ध करून देणे व ही आपल्या देशाची गरज असलेल्या मनुष्यबळाची भूक भागवावी ही अपेक्षा असल्याचे अभ्यासले आहे.

* संजय देशपांडे : -

संजय देशपांडे यांनी त्यांच्या अभ्यास लेखात राष्ट्रीय कौशल विकास कार्यक्रमाचा आढावा घेतला आहे. त्यांच्या मते; युवकांना प्रशिक्षणासोबतच रोजगार देणाऱ्या भागीदारांची आवश्यकता आहे. प्रशिक्षित युवकांना आवाहन आणि संधी हे किती आहेत . याचा आढावा या लेखाचा अभ्यासात घेतला आहे.

* अर्चना दत्ता : -

अर्चना दत्ता यांनी प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना या त्यांच्या लेखाचा अभ्यासात असे म्हंटले आहे की , मानव संसाधन विकास व उद्योजक विकास अंतर्गत युवकांमध्ये कौशल्य विकसित करून अर्थव्यवस्थेत विशेष छाप पाडू शकतो. कौशल्य विकास योजना मानव संसाधन उद्योजकता विकासामध्ये नव्या युगाची सुरुवात केली आहे.

.

* संशोधन पद्धती: - संशोधन करताना संशोधन पद्धती हा संशोधनाचा मुख्य आधार असतो. प्रस्तुत संशोधन पद्धती हे प्राथमिक व दुय्यम आधारसामग्रीवर आधारित आहे. हे संशोधन करण्यासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात येणार आहे.

प्राथमिक आधारसामग्री मध्ये प्रत्यक्ष मुलाखत , प्रश्नावली, निरीक्षण , अनुसूची इत्यादींच्या आधारे प्राथमिक माहिती संकलित केली जाणार आहे. तर दुय्यम आधारसामग्री मध्ये विविध लेख, प्रबंध, संदर्भ ग्रंथ, प्रकाशित अप्रकाशित लेख, दैनंदिन वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी घटकांचा आधार घेणार आहे. म्हणून मी, " लातूर जिल्ह्याच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाचे योगदान, एक चिकित्सक अभ्यास."(२०१५-२०२०) हा विषय निवडला आहे.

* अध्ययन विषयाची निवड : -

भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र व ग्रामीण भागाच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. लातूर जिल्ह्याची अर्थव्यवस्था ही प्रामुख्याने कृषीवर आधारित आहे. परंतु येथे ओद्योगिक वसाहत असल्यामुळे कौशल्यपूर्ण कामगारांची अत्यंत गरज असल्यामुळे, दारिद्र रेषेखालील व बेरोजगारांना रोजगार मिळवून देण्यासाठी येथे विविध योजना राबवल्या जात असल्यामुळे; प्रस्तुत अभ्यासासाठी " लातूर जिल्ह्याच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाचे योगदान, एक चिकित्सक अभ्यास." हा विषय निवडला आहे. यामध्ये लातूर जिल्ह्याच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत राबवल्या जाणाऱ्या योजनांवरील खर्च पाहता तसेच हा कार्यक्रम राबविताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करण्यात येणार आहे.

* संशोधनाची उद्दिष्टे : -

लातूर जिल्ह्याच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाचे योगदान, अभ्यासण्यासाठी पुढील उद्दिष्टे निर्धारित केली आहेत .

१) कौशल्य विकासा कार्यक्रमाअंतर्गत लाभार्थ्यांचा आर्थिक, सामाजिक स्थितीत झालेल्या बदलांचा अभ्यास करणे.

२) लातूर जिल्ह्यात कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राबविलेल्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

३) लातूर जिल्ह्यात राबविलेल्या योजनांच्या खर्च प्रवृत्तीचा अभ्यास करणे.

४) लातूर जिल्ह्याच्या औद्योगिक क्षेत्रातील मागासलेपणाचा अभ्यास करणे.

५) लातूर जिल्ह्यात कौशल्य विकास कार्यक्रम राबविताना येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.

* संशोधनाची गृहितके :-

" लातूर जिल्ह्याच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाचे योगदान, एक चिकित्सक अभ्यास" या अभ्यासासाठी काही गृहीतके विचारात घेतली आहे त ती अशी-

१) कौशल्य विकास कार्यक्रमाने लातूर जिल्ह्याच्या संघटित व असंघटित क्षेत्राच्या विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

२) कौशल्य विकास योजनावर प्रचंड प्रमाणावर खर्च होत आहे.

३) लातूर जिल्हा औद्योगिक क्षेत्रात अति मागासलेला आहे.

४) कौशल्य विकास योजनेअंतर्गत समाजातील बेरोजगार व दीनदुबळ्या घटकांना रोजगार प्राप्ती, शिक्षण, उद्योग स्थापनेसाठी कौशल्य प्रमाणपत्र व भांडवल दिले जाते.

* संशोधन आराखडा : -

संबंधित विषयाचे संशोधन हे वर्णनात्मक व विश्लेषणात्मक क्षेत्र आढावा पद्धतीचे असून; क्षेत्र आढावा पद्धतीद्वारे(प्रत्यक्ष मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण, अनुसूची) चौकशी करून माहिती मिळवून सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. वर्णनात्मक संशोधनाचा मूळ उद्देश हा की, लातूर जिल्ह्याच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाचे योगदान, याचा तथ्य आधारे विश्लेषण करणे.

* तथ्य संकलनाचे स्त्रोत : -

संशोधनासाठी आवश्यक असलेले तथ्य हे प्राथमिक स्त्रोत यासोबतच दुय्यम स्त्रोत यामार्फत संकलित करण्यात येणार आहे.

* प्राथमिक स्त्रोत : -

संशोधनासाठी आवश्यक असलेली महत्त्वाची माहितीही संबंधित उत्तर दात्याकडून प्रत्यक्ष मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण, अनुसूची, इत्यादी द्वारे मिळवण्यात येणार आहे. लातूर जिल्ह्यामधील विविध गावातील युवकांकडून कौशल्य विकास सेंटर चालवणाऱ्या शिक्षकांकडून कौशल्य योजनेसंदर्भात सरकार कडून मिळालेली मदत याविषयी सखोल माहिती मिळविण्यात येणार आहे.

* द्वितीय स्त्रोत : -

विविध लेख, प्रबंध, संदर्भ ग्रंथ, प्रकाशित व अप्रकाशित लेख, दैनंदिन पत्रे, इंटरनेट इत्यादीपासून जमा केलेली तथ्य ही द्वितीय स्त्रोत होय. द्वितीय स्त्रोताचा विशेष हा की तथ्य अथवा आकडे स्वतः संशोधित केलेली नसून ते विविध सरकारी कार्यालय, सांख्यिकी अहवाल, स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत समिती, इत्यादी कडून योजना व योजनांच्या आकडेवारी संकलित करण्यात येणार आहे.

* नमुना आकार : -

लातूर जिल्ह्यातील संघटित व असंघटित क्षेत्राच्या विकासाकरिता दिलेल्या योगदान संबंधी कौशल्य विकास कार्यक्रमाच्या अभ्यासासाठी लातूर जिल्ह्यातील दहा तालुक्यातील गैर संभाव्य नमुना निवड पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. दहा तालुक्यातील समान प्रतिनिधित्व देण्याकरिता या नमुना निवड पद्धतीचा अवलंब करून प्रत्येक तालुक्यातून ८० प्रमाणे८० * १० =८०० अस्या नमुन्याची निवड करण्यात येणार आहे.

* संशोधन कालावधी : -

प्रस्तुत संशोधन समस्येसाठी आर्थिक वर्ष २०१५-२०२० या वर्षाची निवड करण्यात आली आहे.

* संशोधनाची मर्यादा : -

कौशल्य विकास कार्यक्रमाची व्याप्ती निश्चितच मोठी आहे. कौशल्य विकास कार्यक्रमाच्या संपूर्ण अभ्यासावर मर्यादा येतात. म्हणून निश्चित निष्कर्षापर्यंत येण्यासाठी आणि परिपूर्ण अभ्यासासाठी "लातूर जिल्ह्याच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाचे योगदान, एक चिकित्सक अभ्यास".(२०१५-२०२०) एवढ्यापुरताच सदरील शोधप्रबंध मर्यादित राहील.

* आकडेवारीचे विश्लेषण आणि सादरीकरण : -

आकडेवारीचे विश्लेषण करण्यासाठी सांख्यिकीय साधनांचा उपयोग करण्यात येणार आहे. त्यामध्ये सरासरी, साधा वृद्धीदर, सरासरी वृद्धीदर, सीमा विस्तार, प्रमाण विचलन, विचलन गुणांक या साधनांचा समावेश करण्यात येणार आहे.

* प्रकरणाची रूपरेषा : -

१)प्रकरण पहिले : - अ) प्रस्तावना : -

"लातूर जिल्ह्याच्या विकासात कौशल्य विकास कार्यक्रमाचे योगदान, एक चिकित्सक अभ्यास."- अध्ययनासाठी या शोध प्रबंधाचा अभ्यास प्रस्तावित या प्रकरणात सहित एकूण आठ प्रकरणांमध्ये करण्यातयेणार आहे.

ब) संशोधन पद्धती : -

प्रस्तुत प्रकरणात या संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या संशोधन पद्धतीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

२)प्रकरण दुसरे : - संशोधन साहित्याचा आढावा –

दुसऱ्या प्रकरणात कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत ग्रामीण भाग व युवकांच्या विकासासाठी केलेल्या कार्याचा अभ्यास यापूर्वी विविध अभ्यासाचे निष्कर्ष व संशोधनातील विविध महत्त्वपूर्ण बाबींचा अभ्यास संशोधन साहित्याचा आढावा या प्रकरणात येणार आहे.

३)प्रकरण तिसरे :- लातूर जिल्हा : एक दृष्टिक्षेप –

प्रकरण तीन मध्ये लातूर जिल्ह्यातील विविधतेचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. यामध्ये लातूर जिल्ह्याचे इतिहास, स्थान ,क्षेत्रफळ, भूमी, पर्जन्यमान, लोकसंख्या, हवामान, उद्योग क्षेत्र, इत्यादी घटकांचा सारांश घेण्यात येणार आहे.

४)प्रकरण चौथे :- लातूर जिल्ह्यात कौशल्य विकास कार्यक्रमाअंतर्गत राबविलेल्या विविध योजना –

प्रकरण चार मध्ये लातूर जिल्ह्यातील कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राबविलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

५) प्रकरण पाचवे : - अ) कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत विविध योजनेवरील खर्चाची स्थिती - प्रकरण पाच अ मध्ये कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत विविध योजनेवरील खर्चाच्या स्थितीचा अभ्यास करण्यात येणार आहे.

ब) या कौशल्य विकास कार्यक्रमातील तालुकानिहाय लाभार्थी –

प्रकरण पाच ब मध्ये लातूर जिल्ह्यातील कौशल्य विकास कार्यक्रमातील तालुकानिहाय लाभार्थ्यांचा अभ्यास करण्यातयेणार आहे.

६)प्रकरण सहावे : - अ) कौशल्य विकास कार्यक्रम राबविताना येणाऱ्या अडचणी –

प्रकरण सहा अ मध्ये लातूर जिल्ह्यामध्ये कौशल्य विकास कार्यक्रम राबविताना विविध प्रकारच्या येणाऱ्या अडचणींचा अभ्यास या प्रकरणात करण्यात येणार आहे.

ब) कौशल विकास कार्यक्रम राबविताना येणाऱ्या अडचणीवर उपाय योजना -

प्रकरण सहा ब मध्ये लातूर जिल्ह्यामध्ये कौशल्य विकास कार्यक्रम राबविताना येणाऱ्या अडचणीवर उपाय योजनांचा अभ्यास करण्यात येणार आहे.

7) प्रकरण सातवे : - तथ्य विश्लेषण व अर्थनिर्वचन –

विषयासंबंधी प्राथमिकतथ्य याद्वारेप्राप्त तथ्याचे सारणी करण व त्याचे अर्थ विश्लेषण प्रस्तुत प्रकरणात करण्यात येणार आहे.

८) प्रकरण आठवे : - निष्कर्ष व शिफारशी –

प्रस्तुत प्रकरणात करण्यात आलेल्या तथ्य विश्लेषणावरून निघालेले निष्कर्ष व शिफारशी या प्रकरणात सुचविण्यात येणार आहेत.

* संदर्भसूची : -

१) प्रा. सुधीर सेवेकर – उद्योजकता - संकल्पना आणि प्रेरणा- विद्या बुक्स पब्लिशर्स ,औरंगाबाद.

२) डॉ. प्रदीप आगलावे - श्री साईनाथ प्रकाशन १, भगवान घर कॉम्प्लेक्स, धर्मपेठ, नागपूर१०.

३) व्यवसायिक कायदे - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,com२१०.

4) डॉ. उर्मिला रेड्डी - लोकप्रशासनातील कौशल्य विकास कार्यक्रम -अरुणा प्रकाशन, लातूर.

५) विवेक सोताडेकर - लातूर जिल्हा विशेषांक- विद्याभारती प्रकाशन, लातूर.

६) महाराष्ट्राची आर्थिक पाहणी २०१२-२०१३.

7) डॉ. किरण जी. देसले- स्पर्धा परीक्षा अर्थशास्त्र१, दीपस्तंभ प्रकाशन,४२.

८) प्रधानमंत्री कौशल विकास योजना- विकास पीडिया(hi.vikaspedia.in/social.welfare).

९)प्रधानमंत्री कौशल्य विकास योजन(https://economictimes,indiatimes,com).

१०) राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रम- विकास पीडिया-(mr.vikaspedia.in).

११) लातूर जिल्हा- विकिपीडिया (https ://mr.m.wikipedia.org).

१२) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग- विकास पीडिया-(mr.vikas pedia in).

१३) योजना मासिक- ऑक्टोबर २०१५.

१४) योजना मासिक- ऑक्टोबर २०१७.

१५) नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कार्पोरेशन(www.nsdcindia.org).

*संशोधन मार्गदर्शक *

प्राडॉ मारोती धोंडीबा कच्छ .वे

* संशोधक *

शितल नरसिंग पुरी